# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.६०९८/२३/अ.क्र.६०३८/२५/०१**

**श्री. रविंद्रनाथ केशव परब**
३६, बरमदिन शर्मा चाळ, जवाहर नगर,
साईबाब रोड, एकताड मैदान,
खार (पूर्व), मुंबई-४०००५१

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी / सुरक्षा दल**
बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख सुरक्षा अधिकारी यांचे कार्यालय,
१/ झेड लव्ह ग्रोव्ह स्टोअर्स यार्ड, डॉ. ई मोझेस रोड, वरळी, मुंबई – ४०००१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख सुरक्षा अधिकारी (प्र)**
बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख सुरक्षा अधिकारी यांचे कार्यालय,
१/ झेड लव्ह ग्रोव्ह स्टोअर्स यार्ड, डॉ. ई मोझेस रोड, वरळी, मुंबई – ४०००१८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१४.१०.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री. समीर पाहकर व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख सुरक्षा अधिकारी , श्री. अजित तावडे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असे विशद केले की, मूळ जोडपत्रात मागणी केलेली माहिती देण्यात आलेली नाही.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. रविंद्रनाथ केशव परब यांनी दाखल केलेले दि.०८.०५.२०२३ रोजीच्या जोडपत्रानुसार सहाय्यक सुरक्षा अधिकारी श्री. सुनील होळकर हे बृहन्मुंबई महानगरपालिका येथे सुरक्षा दलात नियुक्त झाल्यापासून अद्यापपर्यंत नोकरी / पदोन्नतीसाठी दाखल केलेल्या शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र तसेच पदोन्नती समितीचा अहवाल व पदोन्नतीचा आदेश इत्यादी बाबी मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी दि.१९.०५.२०२३ रोजी आयोगाचा अहवाला देत तसेच बृहनमुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२७.१२.२०१३ रोजीचे परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने उपरोक्त माहिती खाजगी व वैयक्तिक स्वरूपाची असून ती देण्यास नकार दिला असून विभागीय सुरक्षा अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेले समितीचा अहवालाच्या इतिवृत्ताची प्रत सशुल्क देण्याबाबत प्रतिसाद दिलेला आहे. त्याआधी श्री. रविंद्रनाथ परब यांच्या अनुषंगाने माहिती द्यावी

किंवा कसे याबाबत श्री. सुनिल होळकर यांना देखील विचारणा करण्यात आली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ११(१) अन्वये त्यांना उपरोक्त माहिती देण्यात येऊ नये, असे लेखी स्वरूपात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांच्याकडे कळविले आहे. अपिलार्थी यांनी शुल्क भरणा केल्यानंतर श्री. सुनिल होळकर यांच्या पदोन्नतीबाबत समितीचा अहवाल इतिवृत्तांत इत्यादी कागदपत्रे या आधीच अपिलार्थी यांना पुरविण्यात आली तर श्री. होळकर यांनी सादर केलेली शैक्षणिक अहर्ता तसेच जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आलेली नसून वरील माहिती ही खाजगी स्वरूपाची नसल्याचे तसेच त्यास मा.सर्वोच्च न्यायालय यांचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ८(१)(त्र) यांच्या तरतुदी लागू होत नसल्याचा युक्तिवाद श्री. रविंद्रनाथ परब यांनी त्यांच्या दि.१६.०६.२०२३ रोजीच्या प्रथम अपील अर्जात केलेला असून त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख सुरक्षा अधिकारी श्री. अजित तावडे यांनी पारित केलेल्या दि.०४.०७.२०२३ रोजीच्या आदेशात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ८(१)(त्र) चा हवाला देत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी योग्य भूमिका घेतली असल्याचे निर्वाह दिलेला आहे.

या विरुद्ध अपिलार्थी श्री. रविंद्रनाथ परब यांनी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला असून दि.२३.०९.२०२५ रोजी झालेल्या श्री. विकास नारायण घुगे विरुद्ध जन माहिती अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका शैक्षणिक विभाग या प्रकरणात पारित केलेल्या आदेशाप्रमाणे शासकीय सेवेत रुजू झालेल्या सर्व संवर्गाच्या व्यक्तींनी या संवर्गाचा लाभ घेण्याच्या दृष्टीने सादर केलेली कागदपत्रे ही स्वयं प्रेरणेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ४(१)(ख) अन्वय संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरच निवड करणे अपेक्षित असून विशेषतः दिव्यांग / क्रीडा, मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती, जमाती, भटक्या व विशेष मागास वर्ग असलेल्या व आर्थिक दृष्ट्या कमकुवत या वर्गासाठी आरक्षित जागेवर सर्वसाधारण जागांमधील त्यांची नियुक्ती शासन / निमशासकीय नागरी अथवा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारा केली जाते. त्यात त्यांचे वेतन इतर अनुषंगिक लाभ हे शासनाकडून प्राप्त केलेल्या प्राप्त केलेला अथवा अनुदान याद्वारे दिले जाते. अशा सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या बाबतीतील त्यांच्या पात्रते संदर्भातील सर्वच कागदपत्रे स्वयंप्रेरणेने उघड केल्यास शासकीय नियुक्त्या प्राप्त व सुयोग्य उमेदवार यांची निवड झाली किंवा कसे पदभरती करणाऱ्या संस्थेव्यतिरिक्त सगळ्याच नागरिकांना सार्वजनिक लेखापरिक्षण (public audit) करण्याची संधी देखील प्राप्त होत असते. त्यामुळे शासन सेवेत रुजू होणाऱ्या व्यक्ती हे पात्र असल्याविषयी खातरजमा होत असते. प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज अंशतः मंजूर करीत अपिलार्थी यांच्या जोडपत्र व मधील नमूद माहिती श्री. होळकर यांच्या शैक्षणिक अहर्ता व पात्रते संदर्भातील माहिती आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत प्रदान करण्याचे निर्देश देत प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १४.१०.२०२५**